नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | अंक - १३७ | वार गुरुवार दि. ३ ऑक्टोबर २०२४ | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | पाने - ४ | किंमत - ४.०० रुपये | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com
Year - 2nd | Issue - 137 | Blow- Thursday Date 3 October 2024 | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | Pages - 4 | Amout - 4 /- Rs

# घडयाळ चिन्हाबाबत १५ ऑक्टोबरला सुनावणी

## घड्याळ चिन्हाचा वापर करण्यास मनाई करण्याची सर्वोच्च न्यायालयाला विनंती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये 'घडयाळ' या निवडणूक चिन्हाचा वापर करण्यास अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मनाई करावी, अशी विनंती राष्ट्रवादी काँग्रेसने (शरद पवार) सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे. यासंदर्भातील अर्ज पवार गटाच्या वतीने बुधवारी सादर करण्यात आला असून या प्रकरणी १५ ऑक्टोबर रोजी सुनावणी होणार आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने मूळ पक्ष व घडयाळ हे निवडणूक चिन्ह अजित पवार गटाला बहाल केले आहे. त्याविरोधात शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या प्रकरणाची सुनावणी न्या. सूर्य कांत व न्या. उज्जल भुईया यांच्या खंडपीठासमोर होत आहे. ही सुनावणी मंगळवारी १ ऑक्टोबर रोजी होणार होती मात्र, खंडपीठाने पुढे ढकलली. त्यानंतर शरद पवार गटाच्या वतीने नवा अर्ज दाखल केला गेला असून विधानसभा निवडणुकीत घडयाळ या निवडणूक चिन्हाच्या वापराला अटकाव करण्याची मागणी केली आहे.



लोकसभा निवडणुकीमध्ये घडयाळ चिन्हाच्या वापराचा फटका शरद पवार गटाला काही मतदारसंघांमध्ये बसला होता. या निवडणुकीत अजित पवार गटाने घडयाळ चिन्हाचा वापर केला तर शरद पवार गटाने तुतारी या चिन्हाचा वापर केला होता. त्यातून मतदारांमध्ये गोंधळ निर्माण झाला होता. लोकसभेपेक्षा विधानसभेचे मतदारसंघ तुलनेत लहान असतात, मतदारांची संख्याही तुलनेत कमी असते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत शरद पवार गटाला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे अजित पवार गटाला घडयाळ हे निवडणूक चिन्ह वापरण्यास मनाई केली जावी असे अर्जात नमूद करण्यात आले आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी अजित पवार गटाने निवडणूक चिन्हासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे नवा अर्ज करून नवे चिन्ह मिळवावे असे निर्देश न्यायालयाने द्यावेत अशीही विनंती करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस हा मूळ पक्ष व घडयाळ हे निवडणूक चिन्ह या दोन्हीबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निकालाला शरद पवार गटाने आव्हान दिले असल्याने या प्रकरणावर न्यायालय अंतिम निकाल देत नाही तोपर्यंत अजित पवार गटाला नवे निवडणूक चिन्ह दिले जावे अशी मागणी शरद पवार गटाने केली आहे.

शरद पवार गटाच्या आव्हान याचिकेवरील मार्चमध्ये झालेल्या सुनावणीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयावर शंका उपस्थित केली होती.

# यंदा राज्यात थंडीचा कडाका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : राज्यात यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्यानंतर थंडीचा कडाकाही अधिक राहील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. तसेच ऑक्टोबरमध्ये देशाच्या बहुतेक भागांत सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यताही वर्तविण्यात आल्याने ऐन दिवाळीत थंडीसह पावसाच्या सरी बसरण्याची शक्यता आहे.


राज्याच्या बहुतांश भागाला 'ऑक्टोबर हिट'ला सामोरे जावे लागेल, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे. हिवाळयात सरासरीपेक्षा जास्त थंडी पडण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितले. मागील काही वर्षांपासून जगभराला तापमानवाढीचा सामना करावा लागत आहे. प्रशांत महासागरात 'ला - निना' प्रणाली सक्रिय झाल्यास देशभरात सरासरीपेक्षा जास्त थंडी पडू शकते. मात्र त्याबाबत नोव्हेंबरच्या सुरुवातीला अधिक अचूकपणे सांगता येईल, असे ते म्हणाले. ऑक्टोबर महिन्यात देशात सरासरी ७५.४ मिमी पाऊस पडतो. त्या तुलनेत यंदा ११५ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज आहे. मुंबईसह उत्तर कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि पूर्व विदर्भात ऑक्टोबर महिन्यात पावसाचा जोर अधिक राहणार असल्याचे डॉ. महापात्रा यांनी स्पष्ट केले.

### परतीच्या पावसाचा प्रवास सुरू

मोसमी पावसाच्या परतीचा प्रवास पुन्हा सुरू झाला आहे. २३ सप्टेंबरपासून मोसमी पावसाच्या परतीचा प्रवास सुरू होऊन २४ सप्टेंबर रोजी थांबला होता. आता दोन ऑक्टोबर रोजी लेह, लडाख, जम्मू आणि काश्मीर, पंजाब, हरियाना, दिल्ली, हिमाचल प्रदेशातून मोसमी पाऊस पूर्णपणे आणि राजस्थानच्या काही भागातून मोसमी पाऊस माघारी परतला आहे.

## थोडक्यात

### भगिनींच्या लाभातून सेवा शुल्क कपात करणाऱ्या बँकांवर कारवाई करणार



मुंबई : महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. या योजनेच्या बळावर महायुती सरकारने आगामी विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी केली आहे. मात्र जसजसे महिने उलटत आहेत, तसे या योजनेतील काही तांत्रिक त्रुटी समोर येत आहेत. सरकारकडूनही युद्ध पातळीवर या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. लाडकी बहीण योजनेचे पैसे बँक खात्यात आल्यानंतर बँक त्यातून शुल्क कपात करत असल्याची तक्रार अनेक महिलांनी केली होती. यानंतर आता सरकारने याबाबत कठोर पावले उचलली आहेत. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या संदर्भात माहिती दिली आहे. मंगळवारी (दि. १ ऑक्टोबर) 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेचा राज्यस्तरीय आढावा घेण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेण्यात आली. या बैठकीला महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव, एकात्मिक बालविकास योजनेचे आयुक्त कैलास पगारे, सर्व जिल्ह्यातील महिला व बालविकास अधिकारी उपस्थित होते.

# पुण्याच्या बावधन येथे हेलिकॉप्टर कोसळले; तिघांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुण्याच्या बावधनमध्ये हेलिकॉप्टर कोसळल्याने तिघांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनास्थळी हिंजवडी पोलीस दाखल झाले आहेत. काही दिवसांपूर्वी मुळशीमध्ये देखील अशीच घटना घडली होती. सुदैवाने त्या घटनेत जीवितहानी झालेली नव्हती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील बावधनमध्ये सकाळी ६.४५ च्या सुमारास सुमारास हेलिकॉप्टर कोसळलं. या दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती हिंजवडी पोलिसांनी दिली आहे. धुकं असल्याने बराच वेळ हेलिकॉप्टर आकाशात घिरट्या घेत होतं. अखेर ते क्रॅश झालं आणि जमिनीवर कोसळलं. घटनेची माहिती मिळताच हिंजवडी पोलीस पोहचले घटनास्थळी दाखल झाले आहेत.



याआधी देखील मुळशीमध्ये खासगी हेलिकॉप्टर कोसळलं होतं. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झालेली नव्हती. परंतु, त्या अपघातात काहीजण गंभीर जखमी झाले होते. आता पुन्हा एकदा हेलिकॉप्टर कोसळल्याची घटना घडली आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे म्हणाले, या अपघातात तिघांचा मृत्यू झाला आहे. हे हेलिकॉप्टर मुंबईमधील जुहू येथे जात होतं. घटनेची माहिती मिळताच आमची पथकं मदतीसाठी घटनास्थळी रवाना झाली आहेत. स्थानिक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गिरीशकुमार पिल्लई, प्रितमचंद भरद्वाज व परमजीत अशी या अपघातात मृत्यू झालेल्या तिघांची नावं आहेत. दाट धुक्यामुळे हेलिकॉप्टरच्या उड्डाणावेळी काही अडचणी आल्या होत्या. हेलिकॉप्टरच्या उड्डाणानंतर पायलटला धुक्याचा सामना करावा लागला. हिंजवडी पोलिसांनी सांगितलं अग्निशमन दलाच्या पथकासह आम्ही आमचं पथकही घटनास्थळी पाठवलं आहे. डीजीसीए या अपघाताची चौकशी करणार असल्याचं पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी सांगितलं आहे.

# सोलापुरात नवरात्रोत्सवासाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शारदीय नवरात्र महोत्सवाला गुरुवार (दि.३) पासून सुरुवात होत आहे.नऊ दिवसांच्या उत्सवामध्ये गुरुवारी दुपारी शहरात शक्ती देवी प्रतिष्ठापना मिरवणुक निघणार आहेत.नवरात्र उत्सवात शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहून शांतता राहावी यासाठी तीन ते १२ ऑक्टोबर दरम्यान पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

दरम्यान, नवरात्र महोत्सव अनुषंगाने शहरात ४५ ठिकाणी फिक्स पॉईंट लावण्यात आले आहेत तसेच देवी मंदिरास बंदोबस्त दिला आहे. बंदोबस्तासाठी तीन पोलीस उपायुक्त, पाच सहाय्यक पोलीस आयुक्त,१२ पोलीस निरीक्षक,४८ सहाय्यक पोलीस निरीक्षक,८७० पोलीस अंमलदार,७०० पुरुष तर १०० महिला होमगार्ड आणि एक एसआरपीएफची तुकडी तैनात असणार आहे.तसेच वाहतुकीची कोणतीही समस्या निर्माण होऊ नये यासाठी वाहतूक शाखेकडील पोलीस कर्मचारी देखील तैनात असणार आहेत.

ज्योत घेऊन जाणाऱ्या भाविकांना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी नाकाबंदी व पोलीस पेट्रोलिंग नेमण्यात आले आहे. तसेच पहाटेच्या वेळी भावीक रूपाभवानी मंदिरकडे पायी चालत जातात त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून दामिनी पथक पेट्रोलिंग करणार आहेत.

# बदलापूर प्रकरणातील शाळेचे अध्यक्ष, सचिव अखेर अटकेत; ४४ दिवसांनी आरोपींना बेड्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बदलापूर: बदलापुरातील एका नामांकित शाळेत झालेल्या चिमुकल्यांवरील अत्याचार प्रकरणात सहआरोपी असलेले शाळेचे अध्यक्ष उदय कोतवाल आणि सचिव तुषार आपटे यांना अखेर उल्हासनगर परिमंडळ चारच्या पोलिसांनी कर्जत येथून अटक केली आहे. मंगळवारी उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणी वेळी न्यायालयाने पोलिसांच्या कारभारावरून फटकारले होते. त्याचवेळी दोन्ही आरोपींचा अटकपूर्व जामीनही फेटाळला होता. त्याच्या २४ तासातच पोलिसांनी उदय कोतवाल आणि तुषार आपटे या दोघांना अटक केली आहे. बदलापूर शहरात एका नामांकित शाळेत झालेल्या चिमुकल्यांच्या अत्याचार प्रकरणानंतर देशभरात गदारोळ झाला. या प्रकरणी पालकांनी संबंधित अत्याचाराच्या प्रकरणाबद्दल माहिती देऊनही शाळेच्या मुख्याध्यापिका, संस्थेचे अध्यक्ष आणि सचिव या जबाबदार व्यक्तींनी दुर्लक्ष केले. २० ऑगस्ट रोजी शहरात झालेल्या उत्स्फूर्त आंदोलनानंतर न्यायालयाने त्याची दखल घेत या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या शाळेच्या संचालकांवर ही गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला. २० ऑगस्ट रोजी शाळेच्या आवारात झालेल्या तोडफोडीची पाहणी करणारे संस्थेचे अध्यक्ष उदय कोतवाल आणि तुषार आपटे दुसऱ्याच दिवसापासून फरार होते. सुरुवातीला कल्याण सत्र न्यायालयात या दोन्ही आरोपींनी अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला होता. मात्र त्यांचा अर्ज फेटाळल्याने त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मंगळवारी झालेल्या उच्च न्यायालयातील सुनावणीत न्यायालयाने पोलिसांना फटकारले होते. पोलीस आरोपींचा अटकपूर्व जामीन मंजूर होण्याची वाट पाहत आहेत का, असे खडे बोल न्यायालयाने पोलिसांना सुनावले होते. तसेच यावेळी न्यायालयाने आरोपींचा जामीनही फेटाळला होता. त्याच्या २४ तासातच उल्हासनगर परिमंडळ ४च्या पोलिसांनी कर्जत येथून अध्यक्ष उदय कोतवाल आणि सचिव तुषार आपटे यांना अटक केली आहे. परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी लोकसत्ताशी बोलताना या वृत्ताला दुजोरा दिला. दोन्ही आरोपी सोबत होते. त्यांना कर्जत येथून ताब्यात घेतले आहे.



### श्री. विठ्ठलाच्या नित्यपुजेची माहे डिसेंबर पर्यंत संपूर्ण नोंदणी

### महाराष्ट्र राज्यासह आसाम, कर्नाटक, आंध्रप्रदेश राज्यातून पूजा नोंदणी

# विठ्ठल रूक्मिणीमातेच्या ऑनलाईन पुजा नोंदणीला भाविकांचा प्रतिसाद : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या सर्व पूजा श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. या पूजा नोंदणी करण्यासाठी मंदिर समितीने संगणक प्रणाली विकसित केली असून, दि. १ ऑक्टोबर पासून ऑनलाईन पद्धतीने पूजेची नोंदणी सुरू करण्यात आली होती. या सुविधेला भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.



पहिल्या टप्प्यात दि. ७ ऑक्टोबर २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये उपलब्ध झालेल्या पुजेमधून विठ्ठलाच्या नित्यपुजेची संपूर्ण नोंदणी झाली असून, यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली आहे, यावरून सदर प्रक्रिया ही पारदर्शकपणे राबवण्यात आली आहे. याशिवाय, रूक्मिणीमातेच्या १७ नित्यपुजा, ८८ पाद्यपुजा व ३० भाविकांनी तुळशीपूजा नोंदणी केल्या आहेत.

या ऑनलाईन पध्दतीच्या नोंदणीचा शुभारंभ दि. १ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११.०० वाजता मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे व ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर यांच्या शुभहस्ते व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी विभाग प्रमुख संजय कोकीळ, राजेंद्र घागरे, बलभिम पावले व सहायक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी उपस्थित होते.

भाविकांना https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून पूजेची नोंदणी करता येईल. ऑनलाईन पध्दतीने पुजा उपलब्ध करून दिल्यामुळे भाविकांना घरबसल्या पुजा नोंदणी करता येत असल्याने भाविकांकडून समाधान व्यक्त होत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

# ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे लाडकी बहीण योजनेचे पैसे १० ऑक्टोबरच्या आधी मिळणार : अजित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे राज्यात अनेक राजकीय घडामोडी घडत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांची जोरदार तयारी सुरु आहे. यातच सध्या अनेक नेत्यांचे राज्यभरात सभा आणि मेळावे सुरु आहेत. या मेळाव्याच्या माध्यमातून महायुतीचे नेते सरकारने राबववलेल्या योजनांची माहिती सांगत आहे. काही दिवसांपूर्वी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंमलात आणली. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील लाभार्थी महिलांना महिन्याला १५०० रुपये देण्यात येत आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी राज्यातील कोट्यवधी महिला पात्र ठरल्या आहेत. या योजनेचा लाभ मिळालेल्या महिलांना जुलै पासून महिन्याला १५०० रुपये देण्यास सुरुवात झाली. राज्य सरकारने सर्वात आधी दोन महिन्यांचे एकत्र म्हणजे जुलै आणि ऑगस्ट महिन्यांचे मिळून महिलांच्या खात्यावर तीन हजार रुपये जमा केले होते. अशातच आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लाडक्या बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना आता ऑक्टोबर आणि नोव्हेंबर असे दोन महिन्यांचे पैसे खात्यावर जमा होणार असून नोव्हेंबर महिन्यांचे पैसे देखील ऑक्टोबरमध्येच म्हणजे दिवाळीलाच जमा होणार आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.

## संपादकीय....

### पक्षचिन्हावरून आमने-सामने

शरद पवार यांच्या पक्षातर्फे सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. यामध्ये घड्याळ हे राष्ट्रवादी काँग्रेसचं चिन्ह म्हणून अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला देऊ नये. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हे चिन्ह त्यांना मिळू नये त्याऐवजी नवं चिन्हं द्यावं अशी मागणी केली आहे. अजित पवारांच्या पक्षाने नव्या चिन्हासाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज करावा आणि त्यांच्याकडून मिळालेल्या चिन्हावर निवडणूक लढावी अशी मागणीही या अर्जात करण्यात आली आहे. जुलै २०२३ या महिन्यात अजित पवार यांनी ४१ आमदारांना बरोबर घेऊन बंड केलं आणि आपणच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आहोत असा दावा केला. त्यामुळे शरद पवारांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या पक्षाचे दोन तुकडे पडले. ज्यात शरद पवारांचा राष्ट्रवादी पक्ष विरोधात राहिला तर अजित पवारांचा राष्ट्रवादी पक्ष सत्तेत गेला. हा वाद जेव्हा निवडणूक आयोगापुढे गेला होता तेव्हा अजित पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे पक्षचिन्ह निवडणूक आयोगाने दिलं होतं. त्यानंतर आता शरद पवार यांनी हे चिन्ह गोठवण्यात यावं आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला नवं चिन्हं द्यावं अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. शरद पवारांनी निवडणूक आयोगाने घड्याळ हे पक्षचिन्ह आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव अजित पवारांना देण्याचा निर्णय घेतला आहे त्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. जर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात शरद पवारांच्या बाजूने निर्णय दिला आणि चिन्ह गोठवलं तर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची अडचण चांगलीच वाढू शकते.

## केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत उल्हासनगर शहरातील मलनिःसारण योजनेच्या टप्पा ३ चा भुमिपुजन ऑनलाईन सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर प्रतिनिधी/ बाळासाहेब अहिरे :

०२ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी १०:०० ते ११:०० वा. दरम्यान मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विज्ञान भवन नवी दिल्ली येथून संपन्न झाला. सदर कार्यक्रमाची सुरूवात मा. आमदार श्री. कुमार आयलानी यांचे हस्ते दीप प्रज्वलाने झाली. आज महात्मा गांधी व लालबहाद्दूर शास्त्री यांची जयंती असल्याने राज्यगीतानंतर सदर महापुरूषांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

उल्हासनगर शहरातील अस्तित्वातील मलवाहिन्या ३० ते ४० वर्ष जुनी आहे. सन २००५ च्या महाभयंकर पुरामुळे अस्तित्वातील बऱ्याच मलवाहिन्या खराब झालेल्या आहेत. तसेच उल्हासनगर शहरातील सांडपाणी नाल्यामार्फत उल्हास व वालधुनी नदीमध्ये जात असल्याने शहरातील जलस्त्रोत असलेली उल्हासनदी दुषित होत होती, जे पर्यावरणासाठी हानीकारक होते. त्यामुळे शहरात मलवाहिन्या टाकणे आवश्यक होते.

केंद्र पुरस्कृत योजना अमृत २.० अंतर्गत ४१६.६६ कोटीची भुयारी गटार योजना टप्पा ३ अंतर्गत शहरात २२८ लांबी किमी च्या मलवाहिन्या टाकणे, १९-५० द.ल.लि. क्षमतेचे मलशुध्दीकरण केंद्र उभारणे, मालमत्तांना मलवाहिन्या जोडण्या देणे, रस्ते पुर्ववत दुरूस्त करणे, मलवाहिन्यासाठी सम्राट अशोक नगर नाला, रेल्वे क्रॉसींग नाला, भरत नगर नाला, अंबिका नाला या ठिकाणी मलवाहिन्यांसाठी रेल्वे क्रॉसिंग करणे इत्यादी कामे या योजनेत अंतर्भुत असून त्यानुषंगाने उल्हासनगर शहरात ३८ किमी मलवाहिनी टाकण्यात आलेली आहे. तसेच शहरात १२१० मॅनहोल तयार करण्यात आलेले आहे. यासाठी आजचा हा ऑनलाईन भूमीपूजन सोहळा मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी यांचे हस्ते उल्हासनगर शहरात दुसऱ्यांदा पार पाडण्यात आला. ही उल्हासनगर शहरासाठी गौरवाची बाब आहे.

स्वच्छता ही सेवा या अंतर्गत सफाई कामगार, मुकादम आणि




स्वच्छता निरीक्षक यांना प्रमाण पत्र देऊन गौरविण्यात आले तसेच आर के. टी. कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी एक पेड माँ के नाम व जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. वेदांत कॉलेज, एस. एस. टी. कॉलेज, सेंचुरी रेयॉन शाळा, मातोश्री रमाबाई आंबेडकर शाळा, भाजी मंडई, हॉटेल्स यांनी स्वच्छता ही सेवा या अभियानात सहभाग घेतलेल्याबाबत त्यांना प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

कार्यक्रमाची सांगता महापालिका प्रशासक तथा आयुक्त यांचे भाषणाने झाली. सदर भाषणात पर्यावरण, वृक्षारोपनाचे महत्व पटवून स्वच्छता राखणेबाबत आयुक्तांनी सर्व नागरिकांना आवाहन केले.

सदर कार्यक्रमास मा. आमदार कुमार आयलानी, महापालिका प्रशासक तथा आयुक्त श्री. विकास ढाकणे, अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर व श्री. किशोर गवस, जेष्ठ माजी नगरसेवक श्री. जमनु पुरस्वानी, श्री. किशोर वनवारी, मुख्य लेखाधिकारी श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा परीक्षक श्री. शरद देशमुख, उप मुख्य लेखा परीक्षक श्री. नगदीवे, पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. परमेश्वर बुडगे, महापालिका सचिव सौ. प्राजक्ता कुलकर्णी, सर्व प्रभाग समितीचे सहा. आयुक्त, भांडार विभाग प्रमुख श्री. अंकुश कदम, सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी श्री. मनिष हिवरे, मुख्य बाजार निरीक्षक श्री. विनोद केणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री. एकनाथ पवार, दिव्यांग कल्याण योजना विभाग प्रमुख श्री. राजेश घनघाव, क्रीडा विभाग प्रमुख श्री. शांताराम चौधरी, सुरक्षा विभाग प्रमुख श्री. यशवंत सगळे, अग्निशमन अधिकारी श्री. सुरेश बोंबे, सिस्टीम अनालिस्ट सौ. श्रद्धा बाविस्कर, संबंधित कामाचे ठेकेदार तसेच ए. जी. ओ., इतर मान्यवर व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे यांनी केले.

## डुबेरे येथील जनता विद्यालयातील विद्यार्थ्यांनी केली स्वच्छता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी:- डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे होते.

व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून माजी विद्यार्थी महेश वारुंगसे,पोलीसपाटील रामदास वारुंगसे,जेष्ठ शिक्षक दिगंबर जाधव, सोमनाथ पगार,सोमनाथ गिरी,अरुण डावरे,विद्या ठाकरे , वरिष्ठ लिपिक राणी शिंदे,रोहिणी भगत आदी उपस्थित होते.

उपस्थितांच्या हस्ते महात्मा गांधी व शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .स्वच्छता ही सेवा हा उपक्रम विद्यालयात उत्साहात राबविण्यात आला.स्वच्छता अभियानाचे उदघाटन मुख्याध्यापक वाजे व महेश वारुंगसे यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी गांधी व शास्त्री यांच्या जीवन व कार्याची ओळख करून देवून स्वच्छतेचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.स्काऊट-गाईडचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी शालेय परिसराची स्वच्छता केली.



सूत्रसंचालन शालेय सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर.करपे यांनी तर आभार सुनिल ससाणे यांनी मानले .यावेळी कचेश्वर शिंदे, राजेंद्र गांगुर्डे,डी. ए. रबडे, जयश्री गोहाड, सविता खडांगळे,सुनिता ढोली,सीमा गोसावी, रेवणनाथ कांगणे ,सोमनाथ बोडके ,मारुती डगळे, किशोर शिंदे,रवि गोजरे, ज्ञानेश्वर कडभाने आदींसह शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## शांतता व एकतेचे प्रतिक देणारे महात्मा गांधी यांचे कार्य अजरामर : रविशंकर इठूले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोदिंया /प्रतिनिधी : या देशाचे सुत्र हातात घेऊन देशाला नवी वळण देणारे आणि समाजिकता पाळणारे महात्मा गांधी यांनी देशाते हित साधले. भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केला. त्या प्रयत्नाची सर्व देशवासीयांनी जाण ठेवली पाहिजे. म्हणून शांतता व एकतेचे प्रतिक देणारे महात्मा गांधी यांचे कार्य अजरामर आहेत. असे प्रतिपादन मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांनी केले. ते अध्यक्ष स्थानावर बोलत होते.



यावेळी अस्मिता तेलंग, साधना पारधी, मुन्नाभाई नंदागवळी, प्रगती खोब्रागडे, स्वाती राणा, अर्चना चव्हाण, प्रदीप ढवळे व तुषार महाजन आदी प्रामुख्याने उपस्थित होते. प्रसंगी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना माला अर्पण केली. दीपप्रज्वलन करण्यात आले.

उपस्थित मान्यवरांनी यावेळी अभिवादन केले. तसेच आपले विचार व्यक्त केले. सदर कार्यक्रम अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथे (दि.०२-१०) सकाळी ७.३० वाजता संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांनी मानले. अशाप्रकारे कार्यक्रम समाप्त झाला.

## मंगरुळपीर येथे रस्ता खचला; ट्रक फसला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गौरवकुमार इंगळे तालुका प्रतिनिधी/मंगरूळपीर : अमरावती वाशिम राष्ट्रीय महामार्ग वरील मंगरूळपीर शहरालगत असलेल्या समस्यांवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे दुर्लक्ष नवीन नाही. कधी या महामार्गावरील प्रकाश स्तंभ आठवडाभर बंद असतात तर कधी जड वाहनामुळे नाली वरील स्लॅबचे तुकडे होत असतात. ज्या ठिकाणी महामार्गावरून वसाहतींकडे जाणारे नियमित वापरले जाणारे रस्ते आहेत नेमका त्या ठिकाणीच नालीवरील स्लॅब हा तकलादू स्वरूपाचा बनवलेला आहे. यासंदर्भामध्ये शेलगाव ग्रामपंचायत मधील सामाजिक कार्यकर्ते पवन इंगोले यांनी अनेक वेळा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना कळवले परंतु प्राधिकरणाचे शहरालगतच्या समस्यांवर कायमचे दुर्लक्ष आहे. दिनांक २ ऑक्टोबर रोजी एक ट्रक महामार्गावर उभा असताना ट्रकच्या वजनामुळे महामार्गाच्या चेंबरला इजा होऊन चेंबर फुटले. व चेंबरखाली असलेल्या पाईप सोबत निकृष्ट दर्जाचे बांधकाम देखील उघड पडले. सदर महामार्ग सुरू होऊन केवळ चार वर्ष झाले आहे. त्यामुळे आता या संपूर्ण कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न निर्माण होत आहे. यावर कार्यकारी अभियंता गणोरकर यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.



## काटी येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : माजी बांधकाम व आरोग्य समिती सभापती जिल्हा परिषद पुणे तथा संचालक श्री प्रवीण माने यांच्या माध्यमातून संपूर्ण इंदापूर तालुक्यातील नागरिकांसाठी राबविण्यात येत असलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आज काटी गावात संपन्न झाले.




प्राथमिक आरोग्य केंद्र काटी येथे आयोजित करण्यात आलेल्या या नेत्र तपासणी शिबिराच्या निमित्ताने तब्बल १०९३ हून अधिक नागरिकांनी आपली नेत्र तपासणी करून घेतली. यातील ७४० नागरिकांना चष्मे वाटप करण्यात आले असून आवश्यकता असणाऱ्या २४ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया पुणे येथील भारती विद्यापीठ हॉस्पिटल येथे होणार असल्याची माहिती प्रवीण माने यांनी यानिमित्ताने दिली.

संदीप सोलनकर, वसंत सोलनकर, शिवाजी जगताप, गौरव पवार, किरण देवकर, निलेश रंधवे, छगन बनसुडे, अंकुश दोरकर यांनी काटी येथील या नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.

तर या कार्यक्रमाचे निमित्ताने विलास बापू वाघमोडे, छायाताई पडसळकर, अमोल मुळे, सुनील खाडे, सचिन सोलनकर, सुनीताताई भोसले, आस्माताई मुलाणी, भीमराव यादव, दत्तात्रय माने, गणेश गुरव,भीमराव यादव, पांडुरंग मोहिते, डॉ. शरद शिर्के, रणजीत गोळे, राजाराम गोफणे, आरडे सर, मंगेश माने, विकास भोसले, सतिश भोसले, विशाल भोसले, केदार कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

**१३ गरजू शेतकऱ्यांना १५ खोंडाचे वाटप** — **व्यवस्थापक मनोज श्रोत्री**

## मंदिर समितीच्या गोशाळेतील खोंडे शेतकऱ्यांना मोफत वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या गोशाळेतील खोंडे गरजू शेतक-यांना मोफत उपलब्ध करून दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.



मंदिर समितीची पंढरपूर नगरपरिषद हद्दीत यमाई तलाव येथे गोशाळा आहे. या गोशाळेत सुमारे लहान-मोठी २५० गाई-वासरे आहेत. सदर गोशाळेतील खोंडे गरजू शेतक-यांना योग्य त्या अटी व शर्तीवर पाळावयास देण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून अर्ज मागविण्यात आले होते. त्यामध्ये २० शेतक-यांनी अर्ज दाखल होते.

दिनांक ३० सप्टेंबर रोजी आलेल्या अर्जाची छाननी करून ईश्वर चिट्टीद्वारे निवड करून १३ गरजू शेतक-यांना मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर यांच्या शुभहस्ते १५ खोंडाचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये प्रत्येकी १ ते २ खोंडे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. यावेळी विभाग प्रमुख डॉ. प्रशांत सर्वगोड, सहायक विभाग प्रमुख मोहन औसेकर, गोशाळेतील कर्मचारी वर्ग व अर्जदार शेतकरी उपस्थित होते. सदरची प्रक्रिया मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व गोशाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भास्करगिरी गुरू किसनगिरीबाबा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

गोशाळेतील गाईंच्या संगोपणासाठी पूर्ण वेळ पशुवैद्यकीय अधिकारी व पुरेसा प्रमाणात कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात आला आहे. आजारी गाईंची आवश्यक ती काळजी घेण्यात येते. सदर गाईंची विमा देखील उतरविण्यात आला आहे. त्यांना चारा म्हणून पशुखाद्य, देशी ज्वारीचा कडबा, हिरवा चारा इत्यादी खाद्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण करण्यासाठी कापडी / पत्र्याचे शेड उभारण्यात आले आहे. या गाईंपासून मिळणा-या दुधाचा वापर श्रींच्या नित्योपचारासाठी करण्यात येतो. तसेच गोशाळेसाठी चारा किंवा देणगी द्यायची असल्यास यमाई तलाव येथील गोशाळेच्या कार्यालयात किंवा मंदिर समितीच्या कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यावेळी केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर ऐतिहासिक स्मारक संघर्ष समितीच्या वतीने ना. केसरकर यांना दिले विविध मागण्यांचे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आज दिनांक २ ऑक्टोबर २०२४ रोजी मुंबई शहर चे पालकमंत्री,मान.नामदार दीपक केसरकर यांच्या शासकीय निवासस्थान रामटेक येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ऐतिहासिक स्मारक संघर्ष समिती च्या वतीने शिष्ट मंडळांनी भेट घेतली. या पार्श्वभूमीवर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ऐतिहासिक स्मारक संघर्ष समितीने १०० संघटना एकत्र येऊन आंदोलनाचा पावित्र्य घेतल्यानंतर झालेल्या भेटीत मान.मंत्री महोदयांनी महाराष्ट्रातील सर्वच बाबासाहेब आंबेडकर,त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर, माता भिमाई यांचे वास्तव्य आणि पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमी, व ठिकाण आदीच्या निधी आणि प्रशासकीय मान्यता साठी लवकरच मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्याचे आश्र्वासित केलें.



त्याचबरोबरच डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे मुळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील आंबडवे याठिकाणी मुंबई विद्यापीठाला १४ अकर ग्रामस्थ भावकीच्या वतीने जागा देण्यात आली आहे. त्याबदल्यात स्थानिकांना रोजगारची संधी देण्यात येईल असे सांगण्यात आले होते. पण अजूनही कोणतेही सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. मुंबई महानगर पालिका अखत्यारीतील बालवाडी शिक्षक मदतनीस यांना काम करून देखील दिवाळीला साधी भेट दिली जात नाही ती दिली गेली पाहिजे या विषयावर त्यांनी सकारात्मक दाखवून त्यावर मान. आयुक्तांना पत्राद्वारे रीमा तातडीने बैठक घेऊन विषय घेण्याची सूचना केली आहे. ही मागणी देखिल मान्य करण्यात आली. या बैठकीस मान. कामगार नेते रमेश मारुती जाधव.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष संघटक विलासभाऊ रुपवते, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू अक्षय दिलीपराव आंबेडकर,विश्वशाती सामाजिक संस्था अध्यक्ष प्रतिक धनराज कांबळे, बाबासाहेब आंबेडकर यांचे गाव आले सुदर्शन सकपाळ ुळींह ंिहश शिश्रिश छत्रझ अध्यक्षा सारिका शिंदे आदि मान्यवर उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### हत्तुर ब्रिजवर अपघात

सोलापूर (प्रतिनिधी) हत्तुर ब्रिजवर अपघातात एक जण जखमी झाल्याची घटना २९ सप्टेंबर रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी सागर सुरेश पोतदार (वय-२९,रा.निर्मल हौसिंग सोसायटी,आदित्य नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चार चाकी टाटा सुमो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी हे त्यांच्या ताब्यातील वाहन क्रमांक एम एच.१३.डीझेड.०६२१ यावरून सोलापूरकडे येत असताना हत्तुर ब्रिज जवळ येणारी टाटा सुमो वाहन क्रमांक केए.२८.एन.५२१३ यातील चालक याने निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने गाडी चालवून फिर्यादी यांच्या वाहनास समोरून धडक देऊन गंभीर दुखापत करून घटनास्थळावरून पळून गेला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल घुगे हे करीत आहेत.

### घराच्या हॉलमधून चार्जिंगला लावलेला मोबाईल पळवला

सोलापूर (प्रतिनिधी) राहत्या घरातील हॉलमध्ये अज्ञात चोरट्याने प्रवेश करून चार्जिंगला लावलेला मोबाईल चोरून नेल्याची घटना १ ऑक्टोंबर रोजी घोसकी नगर कुमठे गाव येथे घडली.याप्रकरणी पुष्पा रमेश कदरे (वय-३८,रा.घोसकी नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून दोन अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भिसे हे करीत आहेत.

### घरासमोर पार्क केलेली दुचाकी लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम एच.१३.बीडी.२२६८ हि अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २७ ते २८ सप्टेंबर दरम्यान महालक्ष्मी नगर विडी घरकुल येथे घडली.याप्रकरणी संदीप यल्लुसा हबीब (वय-४५,रा.महालक्ष्मी नगर) यांनी एम आयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# ७५ दिवसात ३८३ कोटीचा निधी आणण्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगीण विकासाकरिता भरीव निधी आणण्यामध्ये आमदार सचिन कल्याणशेट्टी हे अव्वल ठरले आहेत. गेल्या ३ दशकांचा विकासाचा अनुशेष भरून काढण्याकामी यशस्वी ठरलेले आमदार कल्याणशेट्टी यांना मावळत्या पंचवार्षिक मधील सुरुवातीच्या काळातील आघाडी सरकारमध्ये देखील विकास कामांकरिता निधी आणण्यामध्ये ते मागे राहिलेले नांहीत. त्यानंतर देखील विकास निधीचा चढता आलेख पाहता गेल्या ७५ दिवसात त्यांनी रुपये ३८३ कोटीचा निधी आणण्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव लोकप्रतिनिधी ठरले आहेत.

**अक्कलकोट विधानसभा मतदार संघ हा सीमाभागातला राज्याचा टेलएंड तालुका हा अवर्षण दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. तो पुसून काढण्यासाठी आमदार कल्याणशेट्टी यांनी आमदारकीच्या सुरुवातीच्या काळापासूनच कंबर कसल्याने मतदार संघाला अच्छे दिन आज पाहायला मिळत आहेत. या अगोदरच्या लोकप्रातीनिधिनी पुन्हा येऊच्या नादात विकासाचा अनुशेष भरून निघाला नांही. आमदार कल्याणशेट्टी यांनी ओळखून मतदार संघाच्या विकासासाठी संधीचे सोनं करण्याकामी अग्रेसर ठरले आहेत.**

आमदार कल्याणशेट्टी यांनी गेल्या ७५ दिवसामध्ये मतदार संघातील रस्त्यांच्या दर्जा उन्नतीकरिता रु.६१ कोटी, इको टुरिझम केंद्र कर्जाळ रु.२४ कोटी, मतदार संघातील २८ ग्रामपंचायत पर्यावरण पूर्वक व स्मार्ट करिता निधी रु.६ कोटी, श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे उपजिल्हा रुग्णालय बांधकाम करिता रु.१०८ कोटी, यापैकी सुमारे रु.७० कोटीचा बांधकाम निधीची निविदा निघाली आहे. श्रीक्षेत्र अक्कलकोटातील उत्तर व दक्षिण पोलीस ठाण्यांच्या इमारती करिता रु.१० कोटी, बहुप्रतीक्षित अक्कलकोट न्यायालयाच्या इमारत बांधकाम करिता रु.६० कोटी निधी तर विधानसभा मतदार संघातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगांव दर्गनहळ्ळी, धोत्री या गावाला जोडणाऱ्या चौपदरीकरण करणे या कारीताच्या रु.११ कोटी ७० लाख ९३ हजार ३९९ ची बी-१ निविदा, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सोलापूर यांनी नुकतीच काढली आहे. याबरोबरच अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी नगर परिषदेकरिता



शहर विकासासाठी विविध योजनेतून आमदार कल्याणशेट्टी यांनी भरीव निधी आणण्यात यशस्वी झाले आहेत.

## अंथुर्णे ग्रामपंचायत व ग्रामसेवक यांनी दुजाभावाने केलेल्या अन्यायाविरोधात इंदापूर पंचायत समिती येथे भाजी भाकरी आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी /अतुल सोनकांबळे

३० सप्टेंबर २०२४ रोजी, आंथुर्णे येथील आकाश संतोष वाघमारे व चेतन युवराज थोरात यांच्यावर अंथुर्णे ग्रामपंचायत व ग्रामसेवक यांनी दुजाभावाने केलेल्या अन्यायाविरोधात इंदापूर पंचायत समिती येथे भाजी भाकरी आंदोलन करण्यात आले.



संबंधित आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता इंदापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. सचिन खुडे साहेब यांनी तात्काळ संबंधित प्रकरणाची फेर तपासणी करून संबंधित ग्रामपंचायत व ग्रामसेवक तसेच पदाधिकारी यांच्याकडून चौकशी करून अहवाल एक आठवड्याचे आत मागवून योग्य ती कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यामुळे सदर आंदोलन यशस्वी झाले.

सदर आंदोलनास प्रामुख्याने बहुजन समाज पार्टीचे मा.जिल्हाध्यक्ष व सदस्य सन्माननीय विजय जगताप साहेब बहुजन समाज पार्टी पुणे जिल्हा कोषाध्यक्ष श्रीपती चव्हाण साहेब वंचित बहुजन आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष मनोज साबळे इंदापूर शहर चे माजी अध्यक्ष सुभाष खरे सर,युवा नेते उमेश मखरे, तालुका संघटक कालिदास साबळे, शाखा उपाध्यक्ष महेंद्र साबळे, युवा शाखा अध्यक्ष सुयश भोसले व इतर सन्माननीय पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

## निफाडला ऊस पिक परिसंवाद संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




निफाड/प्रतिनिधी : निफाड येथे ऊस उत्पादक शेतकरी बांधवांसाठी द्वारकाधीश साखर कारखान्याच्या वतीने ऊस पीक परिसंवादाचे आयोजन स्वरा लॉन्स निफाड येथे करण्यात आले होते ,

एकरी शंभर मे टन ऊस उत्पादन नाचे तंत्रज्ञान या विषयावर ऊस पीक परिसंवाद द्वारकाधीश साखर कारखाना लि. शेवरे चेअरमन शंकरराव सावंत यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आला होता ,परिसंवादाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने करण्यात आली याप्रसंगी परिसंवादाचे प्रमुख मार्गदर्शक ऊस विशेषयज्ञ वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट चे रमेश हापसे यांनी ऊस उत्पादन वाढीसाठी शेतकरी बांधवांना मोलाचे मार्गदर्शन केले व शेतकरी बांधवांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देऊन समाधान केले,

याप्रसंगी कारखान्याचे चेअरमन शंकरराव सावंत, अनिल पा. कुंदे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले ,यावेळी व्यासपीठावर निफाड नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, राजेंद्र सोनवणे, संजय सांगळे, खंडू बोडके, राजेंद्र सोमवंशी ,मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी भालेराव, कार्यकारी संचालक सचिन सावंत, संचालक कैलास सावंत, सुपरवायझर विकास पाटील, मुख्य शेतकीअधिकारी विजय पगार, जनरल मॅनेजर बाळासाहेब कर्पे ,सरपंच विजय सोमवंशी, पंकज सोमवंशी ,तसेच परिसरातील शेतकरी बांधव यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार राजेंद्र सोमवंशी यांनी मांनले

## कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी मराठी व सेमी इंग्रजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अक्कलकोट यांच्यावतीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख कल्पना स्वामी यांनी आपल्या भाषणात राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी अहिंसा तत्व पाळले, हिंसा न करता संघर्ष करण्याची शिकवण दिली. गांधीजींनी सत्याग्रहाने अन्यायाविरुद्ध शांततेच्या मार्गाने लढा दिला, स्वदेशी उद्योगांना प्रोत्साहन दिले. ब्रिटिशांच्या वस्तूवर बहिष्कार टाकला. आपणही गांधीजींचे तत्व पाळूयात असे उपस्थित सर्वांना आवाहन केले. यानंतर सेमी विभागाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख निशिगंधा कोळी यांनी बोलताना, भारताचे दुसरे पंतप्रधान स्वातंत्र्य सेनानी आणि एक महान नेते म्हणून लालबहादूर शास्त्री यांची ओळख असून अनेक विद्रोही मोहिमांचे ते नेतृत्व केले होते. स्वातंत्र्यासाठी सात वर्षे तरुंगवास भोगले, त्यांनी जय जवान जय किसान असा नारा दिला होता. त्यांचा देशप्रेम, अखंडता आणि एकता या मूल्यांवर खूप विश्वास होता असे मत व्यक्त केले.

यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप, सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.कल्पना स्वामी, रविकिरण दंतकाळे, निंगप्पा कोटनुर, निशिगंधा कोळी, विद्याश्री बिराजदार, वनिता काजळे, तसेच शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

## शाळेच्या गुणवत्तापूर्ण नावलौकीकामुळे पुरस्काराला गवसणी : लोणारकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर/प्रतिनिधी : मार्गदर्शक, सहकारी शिक्षक आणि गुणवंत विद्यार्थी यांच्या माध्यमातून साकारलेल्या शैक्षणिक कर्तव्यामुळे शाळेचा गुणवत्तापूर्ण नावलौकीक होत आहे. याच गुणवत्तापूर्णतेसाठी नावीन्यपुर्ण उपक्रमशीलतेतून कार्यरत राहील्याने आदर्श शिक्षक पुरस्काराला गवसणी घालता आली. त्यामुळे हा पुरस्कार शाळेच्या गुणवत्तापुर्णतेचा सन्मानच असल्याचे प्रितदान आदर्श शिक्षक पुरस्कार प्रप्त उपक्रमशील शिक्षक प्रमोद लोणारकर यांनी केले.

पंढरपूर तालुक्यातील रोपळे येथील जिल्हा परिषद प्रथमिक शाळेतील उपक्रमशील शिक्षक प्रमोद प्रकाश लोणारकर यांना पंढरपूर तालुका पुरोगामी प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचा आदर्श शिक्षक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. या निमीत्ताने रोपळे ग्रमस्थ व शाळा व्यवस्थापन समिती यांच्यावतीने लोणारकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना लोणारकर बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी सांगितले कि, या पुरस्कारामध्ये शैक्षणिक कार्यातील प्रत्येक घटकाचा मोलाचा वाटा असून पुरस्कारामुळे भविष्यामध्ये अधिक चांगले काम करण्याची उर्जा मिळणार आहे. असे सांगितले.

या कार्यक्रमासाठी माजी कृषी अधिकारी मधुकर गुंजाळ , अशोक शेडगे, तात्यासो गांजाळे , बबन क्षिरसागर, रवी बिस्किटे, सागर बिस्किटे, जोतिराम लोखंडे, सज्जन भोसले, रमेश भोसले, शाळेतील शिक्षक यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शाळेतील उपक्रमशील शिक्षकांकडून होणार्या कार्याचे कौतुक केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षक अरूण माळी यांनी केले तर अभार समाधान आयरे यांनी मानले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सविता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### स्वेरीत राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी

### कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांचे प्रतिपादन

# आपले संस्कार हीच आपली संपत्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'मला कितीही त्रास झाला तरी चालेल पण माझ्यामुळे दुसऱ्यांना त्रास होणार नाही ही भावना जर आपल्या मनात असेल तर आपल्याला त्रास देण्याची भावना कुणाच्याही मनात निर्माण होणार नाही. आपल्या कमतरता कोणत्या आहेत हे इतरांना माहिती असते परंतु आपण किती मजबूत आहोत हे पण दाखवून देणे गरजेचे आहे. लालबहादूर शास्त्री यांच्या 'जय जवान, जय किसान' या घोषणेकडे पाहिले तर आज संशोधनातून शेतीविषयक तंत्रज्ञान निर्माण होणे गरजेचे आहे. जगात कोणत्याही क्षेत्रात गेलो तरी आपण आपले संस्कार विसरु नयेत कारण 'संस्कार हीच आपली खरी संपत्ती आहे आणि ही संपत्ती आपण टिकवली पाहिजे.' असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.

**प्रास्ताविकात स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी महात्मा गांधीजींच्या व लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकून 'आपले ध्येय गाठत असताना आपल्या मर्यादा ओळखून आपण प्रयत्नशील असले पाहिजे' असे सांगून कर्ण आणि परशुराम यांच्या एकाग्रतेची कथा सांगितली. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना एस.पी.कॉलेज, पुणेचे माजी प्राध्यापक विनय रमा रघुनाथ म्हणाले की, 'राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या स्वावलंबी, सत्य व अहिंसा वृत्तीचे संपूर्ण जगाने स्वागत केले आहे. गांधीजींचे विचार हे समाज परिवर्तन करणारे होते. संपूर्ण जगाला प्रेरणा देणाऱ्या गांधीजींच्या विचारांची आज देशाला खरोखर गरज आहे. स्वाभिमानाने जीवन जगताना नोकरी मागणाऱ्या पेक्षा नोकरी देणारे व्हा. जोपर्यंत आपण मनमोकळे बोलत नाही तोपर्यंत समाज हा भयभीत राहतो त्यामुळे समाजाची अधोगती होत आहे. ' असे सांगून महात्मा गांधी व अनेक थोर हुतात्म्यांची उदाहरणे दिली.**

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५५ वी तर भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची १२० वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर हे अध्यक्षस्थानावरून बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून एस.पी.कॉलेज, पुणेचे माजी प्राध्यापक विनय रमा रघुनाथ हे होते. महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीत आणि स्वेरी गीतानंतर पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रपिता म.गांधी आणि भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना कुलगुरू डॉ. महानवर म्हणाले की, 'आपले जवान जेवढे सुरक्षित तेवढाच आपला शेतकरी सुरक्षित होवून उद्योगपती झाला पाहिजे, ही शास्त्रीजींची इच्छा होती. आपल्या मनात जेंव्हा शेतकरी होण्याची इच्छा येईल तेंव्हाच नवीन तंत्रज्ञान निर्माण होईल आणि शेतकरी हा टाटा, बिर्ला यांच्या पंक्तीत जाऊन बसेल. आज पाण्याची टंचाई भासत आहे त्यामुळे आपण रोपे लावावी व ती जोपासावी. याचे चांगले परिणाम येणार्या काळात आपल्याला नक्की जाणवतील म्हणून जीवनात 'वृक्ष लागवड' अत्यंत गरजेची आहे. जर सजीवांची काळजी घ्यायची असेल तर पाण्याची मात्रा वाढवली पाहिजे आणि पाणी वाढवण्यासाठी झाडे लावणे आवश्यक आहे. जर असे केले नाही तर भविष्यात ऑक्सिजनच्या बाटल्या विकत घ्याव्या लागतील. जर आपल्याला विकसित देश म्हणून पुढे जायचे असेल तर आपली उत्पादन क्षमता वाढविली पाहिजे.' पुढे बोलताना त्यांनी शेती, माती आणि विद्यापीठाची नाती याबाबत अभ्यासपूर्ण विवेचन केले. यावेळी गांधी जयंती निमित्त हॉस्टेल वरील क्लीन रूम स्पर्धा व निबंध स्पर्धेतील विजेत्यांचे पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे देऊन विशेष सत्कार करण्यात आले. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते स्वेरीच्या प्राध्यापकांनी केलेले संशोधन, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा मिलाप असलेल्या 'स्वेरीयन' या त्रैमासिकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी संस्थेचे माजी



अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वस्त बी. डी. रोंगे, युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, सांस्कृतिक कार्यक्रमाचे विभागप्रमुख डॉ. आर. एन. हरीदास, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, अभियांत्रिकी व फार्मसीच्या पदवी व पदविकेतील प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन मानसी लोंढे, सृष्टी लामगुंडे व प्रथम वर्ष इंजिनिअरींगचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी केले तर संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी महात्मा गांधीजींच्या संघर्षमय जीवनावर विशेष प्रकाश टाकून आभार मानले.

या कार्यक्रमाच्या पूर्वी मतदार नोंदणीबाबत प्रशासनाच्या वतीने विद्यार्थ्यांना संपूर्ण माहिती देण्यात आली. प्रत्येकांनी आपला वाढदिवस आपल्या वयाच्या संख्येएवढी झाडे लावून साजरा करावा असे आवाहन कुलगुरू डॉ. महानवर यांनी केले. विद्यापीठ परीसरात ५ लाख झाडे लावल्यानंतर स्वेरी सारख्या आदर्श संस्थेबरोबर एकत्र येऊन हे कार्य पुढे नेणार असल्याचे कुलगुरूंनी सांगितले.

व्हाटस्अप वरील माहिती खात्री केल्याशिवाय फॉरवर्ड करू नका, असे आवाहन प्रा. विनय रमा रघुनाथ यांनी सांगितले.

वाढती महागाई पाहून आणखी एकदा मिठाचा सत्याग्रह करण्याची गरज असल्याचे प्रा. विनय रमा रघुनाथ यांनी सांगितले. प्रा. विनय रमा रघुनाथ यांनी आडनाव काढून आई वडिलांचे नाव लावून समाजापुढे एक आदर्श उभा केला आहे.

## थोडक्यात




### पंढरपूर राज्य उत्पादन शुल्क कार्यालयावर महिला काढणार बांगडी मोर्चा

पंढरपूर (प्रतिनिधी) : पंढरपूर तालुक्यातील खेडभोसे ग्रामपंचायत येथिल ग्रामसभेत गावातमध्ये मोठ्याप्रमाणावर अवैद्य रित्या होत असलेली दारू बंद करण्यासाठी सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला होता त्या ठरावाची एक लेखी प्रत ग्रामपंचायत सरपंच यांनी पंढरपूर राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालय येथे देण्यात आली होती परंतु त्यावर पंढरपूर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केली नसल्याने व गावामध्ये पुन्हा अवैद्य रित्या दारू विक्री सुरूच असल्याने पंढरपूर राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालयावर खेडभोसे ग्रामपंचायत येथिल महिला बांगडी मोर्चा काढून पंढरपूर राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालयाचा निषेध करणार असल्याची माहिती मिळत आहे तर गावामधिल तंटामुक्त अध्यक्ष व सरपंच यांनी तर संबंधित तक्रारीची माहिती देताना तीव्र अशी नाराजी व्यक्त केली.

### माहेरी फोन लावण्यास बंदी घालून विवाहितेस मारहाण ; पतीसह पाच जणांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) विवाहिता ही सासरी नांदत असताना तिला सासरकडच्या मंडळींनी मिळून लग्नात योग्य मानपान केला नाही,सोने घातले नाही,हुंडा दिला नाही.यावरून बोलून रात्री उशिरा शिळे खायला देऊन दुकानातील व घरातील कामे लावून त्रास दिला.त्यानंतर माहेरच्या लोकांना फोनवर बोलण्यास न देता किरकोळ कारणावरून मारहाण केली. तसेच विवाहितेच्या पतीने आपले घटस्फोट झाले आहे.असे म्हणून तू आता माहेरी जा असे बोलत घरातून हाकलून दिल्याची फिर्याद सोनाली सत्यकुमार शेठ (वय-३८,रा. नाईकवाडी नगर,अक्कलकोट रोड) यांनी एम आयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती सत्यकुमार,सासरे महेंद्रकुमार,सासू ज्योतीबेन,दीर हिरनेकुमार व जाऊ मोनलबेन (सर्व राहणार वर्धमान कॉलनी,वाढवण,जिल्हा-सुरेंद्रनगर,राज्य गुजरात) यांच्याविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

# चर्मकार समाजाच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास निवडणुकीत परिणाम दिसेल : बबनराव घोलप

## मुंबई आझाद मैदान येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे चर्मकार समाजाचा आठवण मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : चर्मकार समाज हक्कासाठी अनेक वर्ष संघर्ष करीत आहोत. चर्मकार समाज हा स्वाभिमानी असल्याने मोर्चासाठी एकवटला आहे. मागण्याबाबत चर्चा करताना शासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. पण, चर्मकार समाजाच्या मागण्याकडे दुर्लक्ष झाल्यास आगामी विधानसभा निवडणूकीत त्याचे परिणाम दिसून येतील.

प्रत्येक विधानसभा मतदारसंघात १० ते १५ हजार समाजाची मते आहेत .त्यामुळे कुणाला निवडून आणायचे आणि कुणाला पराभूत हा करिष्मा चर्मकार समाज करू शकतो, असा इशारा माजी समाजकल्याण मंत्री व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रमुख बबनराव घोलप यांनी दिला आहे.

मुंबई आझाद मैदान येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व माजी मंत्री बबनराव घोलप यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे मोर्चा झाला. त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मंत्रालयाचे प्रधान सचिव यांच्याशी झालेल्या सकारात्मक चर्चेनुसार मागण्या बाबत शासनाचे जीआर निघाले पाहिजेत. अन्यथा यापुढेही आंदोलनाचा लढा तीव्र केला जाईल अशी भूमिका अनेक कार्यकर्त्यांनी भाषणात व्यक्त केली.

**विधानसभा निवडणूक आचारसंहितेपूर्वी शासन आदेश करण्याची मागणी**

या मोर्चात राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या नेत्या सरोजताई बिसुरे , रावसाहेब चव्हाण, सुनील माने, दलितमित्र डॉ अशोकराव माने ,दीपक खांडेकर ,डॉ दगडू माने आदिची यांची भाषणे झाली. यावेळी मनीषा डोईफोडे , अजित अंकारे , सुखदेव सातपुते, आरती कामटे , शितल शिंदे ,रिना माने , दौपद्री वाघमारे , विद्यालता शिंदे , मारुती शिंदे ,प्रमोद कारंडे ,माधवराव गायकवाड , सचिन कमलाकर , उमाकांत डोईफोडे ,पंढरीनाथ पवार , स्नेहल आबेकर ,शाताराम कारंडे , संदीप बिरणगे, रावसाहेब भोसले , रोहित कांबळे , राजेंद्र प्रधान आदी उपस्थित होते.

दरम्यान , माजी मंत्री बबनराव घोलप यांच्यासह शिष्टमंडळाच्या वतीने मुख्यमंत्री शिंदे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून तर मंत्रालयाचे प्रधान सचिव यांच्याशी थेट चर्चा करण्यात आली. यावेळी सरकार हे चर्मकार समाज बांधवांच्या पाठीशी असून मागण्याबाबत लवकरच निर्णय घेऊ असे आश्वासन त्यांनी दिले.




चर्मकार समाजाच्या प्रमुख मागण्यामध्ये - संत रविदास महाराज यांच्या नावे विद्यापीठ सुरू करून १०० एकर जमीन व त्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी, दोन लाखापर्यंतची कर्ज प्रकरणे मंजूर करण्याचे अधिकार जिल्हा व्यवस्थापकांना देण्यात यावीत, कर्ज प्रकरणातील जाचक अटी रद्द करून अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर कर्ज प्रकरणे मंजूर करावीत,संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे थकीत कर्जे माफ करावीत यासह २४ मागण्यांचा समावेश आहे.

# शाळा व महाविद्यालय परिसरात शिस्त,कायदा व सुव्यवस्थेचे पालन होण्यासाठी इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी पोलीस स्टेशनला दिले निवेदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : सोमवार दिनांक ३० सप्टेंबर रोजी इंदापूर येथे युवकाने गोळीबार केल्याने शैक्षणिक परिसरामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाल्याने माजी मंत्री व राष्ट्रीय सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळातील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, श्री. नारायणदास रामदास हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज, श्री. नारायणदास रामदास प्राथमिक विद्यामंदिर व इंग्लिश मिडिअम स्कुल, येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी इंदापूर पोलीस स्टेशन येथे जाऊन पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांना शिस्त, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी निवेदन दिले आहे. झालेली दुर्घटना अतिशय गंभीर आहे. अशा घटनेने संपुर्ण विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

अशा घटना कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण करतात. यामुळे शाळा महाविद्यालय परिसरात भितीचे वातावरण निर्माण होते. एस.टी.स्टँड परिसर ते महाविद्यालयाच्या गेटपर्यंत पार्किंग व्यवस्था अत्यंत अस्थाव्यस्त असते. काही मोकाट गैरवर्तन करणा-या युवकांचा या परिसरात मोठा वावर असतो.

ज्यामध्ये विविध प्रकारच्या मोटारसायकल व इतर वाहनांचा वापर करुन गोंगाट तयार केला जातो. त्यामुळे मुलांना शिक्षण देण्यास व्यत्यय निर्माण होतो. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा सतत प्रश्न निर्माण होतो. त्या कामी आपण योग्य ती कार्यवाही करुन महाविद्यालय व शाळा प्रशासनास सहकार्य करावे ही विनंती.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे , श्री नारायणदास रामदास हायस्कूलचे मुख्याध्यापक संजय सोरटे, इंदापूर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे, इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या मुख्याध्यापिका फौजीया शेख, मराठी माध्यम विद्यामंदिराच्या मुख्याध्यापिका सुप्रिया आगरखेड , डॉ शिवाजी वीर, डॉ.भिमाजी भोर,डॉ. सदाशिव उंबरदंड डॉ.भरत भुजबळ व इतर दिडशे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंदापूर अर्बन बँकेचा उत्कृष्ट कामगिरीबद्दल सलग २ वर्षांसाठी गौरव






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

इंदापूर दि.३०/९/२४ राज्याचे माजी मंत्री व राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांचे नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या इंदापूर येथील इंदापूर अर्बन को-ऑप बँक लि. बँकेचा सन २०२२-२३ व २०२३-२४ या दोन्हीं आर्थिक वर्षासाठी शून्य टक्के एनपीएच्या सक्षम अशा उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुणे नागरी सहकारी बँक असोसिएशनच्या गुणगौरव सोहळ्यामध्ये शनिवारी (दि.२८) या दोन्हीं वर्षाकरिता २ स्मृतीचिन्हे व प्रशस्तीपत्रे देऊन गौरव करण्यात आला.

**सलग दोन वर्षे शून्य टक्के एनपीए; हर्षवर्धन पाटील यांचेकडून अभिनंदन**

पुणे नागरी सहकारी बँक असोसिएशनचा सन २०२२/२३ व २३-२४ या दोन्हीं वर्षांकरिता झालेल्या नागरी सहकारी बँक गुणगौरव समारंभामध्ये हा गौरव करण्यात आला. इंदापूर तालुक्यातील युवकांना स्वयंरोजगार निर्मितीसाठी कर्ज उपलब्ध व्हावे, या उद्देशाने कर्मयोगी शंकरराव पाटील, राजेंद्रकुमार घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली हर्षवर्धन पाटील यांनी बँकेची स्थापना केली. बँकेच्या या गौरवाबद्दल इंदापूर अर्बन बँकेचे संस्थापक व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूर अर्बन बँकेचे सभासद, संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी व हितचिंतक यांचे अभिनंदन केले.

**बँक तालुक्यातील जनतेच्या दैनंदिन कामकाजाचा घटक : हर्षवर्धन पाटील**

**इंदापूर अर्बन बँकेस सन २०२३ /२४ या आर्थिक वर्षामध्ये ऑडिट वर्ग अ मिळाला आहे. या बँकेचे माध्यमातून हजारो कुटुंबांचे संसार उभे राहिले आहेत. इंदापूर अर्बन बँक ही तालुक्यातील जनतेच्या दैनंदिन कामकाजाचा अविभाज्य घटक बनली आहे, असे गौरवोद्गार बँकेचे संस्थापक व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी काढले.**

सदर गौरव समारंभ प्रसंगी राज्याचे सहकार आयुक्त दिपक तावरे, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे आयुक्त अनिल कवडे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक सतीश मराठे, महाराष्ट्र राज्य सह बँक लि. मुंबई चे प्रशासक विद्याधर अनास्कर, पुणे नागरी सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते.

सदरचा पुरस्कार बँकेचे चेअरमन देवराज जाधव, व्हा. चेअरमन सत्यशील पाटील, संचालक लालासाहेब सपकाळ, तानाजी निंबाळकर, विजय पांढरे, मच्छिंद्र शेटे पाटील, सुभाष बोंगाणे, स्वप्निल सावंत, संजय जगताप, अविनाश कोतमिरे, मुख्य कार्यकारी अधिकारी विजय तावरे, वसुली अधिकारी जोतीराम जामदार यांनी स्वीकारला.

# रेशनवरती मिळणारा फोर्टिफाईड तांदूळ आरोग्यास फायदेशीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका):- रेशनिंग दुकानामधून मिळणारा तांदूळ हा फोर्टिफाईड तांदूळ आहे. सध्या स्वस्त धान्य दुकानातील तांदळात प्लॅस्टिकचे तांदूळ मिळत असलेबाबत ग्राहक दुकानदारांना विचारणा करत आहेत. केंद्र शासनाच्या अन्नसुरक्षा योजनंअंतर्गत हा फोर्टिफाईड तांदूळ सर्व स्वस्त धान्य दुकानातून वितरित करण्यात येत आहे. नागरिकांनी या तांदळाच्या वापराबाबत कोणताही गैरसमज न बाळगता याचा आहारात समावेश करणे गरजेचे असून हा तांदुळ खाल्ल्याने कोणतेही दुषपरिणाम होणार नाही तसेच हा फोर्टिफाईड तांदूळ आरोग्यासाठी फायदेशीर असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी सांगितले

**जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे**

फोर्टिफाईड तांदूळामध्ये पोषकयुक्त घटक आहेत. सामान्य तांदळापेक्षा फोर्टीफाईड तांदूळ अधिक पोषक असून शरीरास आवश्यक पोषक तत्वांची पुर्तता फोर्टिफाईड तांदूळ करतो. शरीरात पोषक तत्वाचे घटक कमी असतील तर फोर्टिफाईड तांदूळ खाल्याने पोषणतत्वाचे कमतरता दूर करण्यास मदत मिळेल. फोर्टिफाईड तांदूळमध्ये थलोसिमिया, सिकलसेल असे आजार रोखण्यासाठी उपयुक्त आहे. फोर्टिफाईड तांदळामध्ये लोह, फॉलिक सिड, व्हिटामिन बी-१२ चे सूक्ष्म अन्नद्रव्य असून आरोग्याच्या दृष्टीने उत्त्म आहे. वजनाने हलके असल्याने ते पाण्यावर तरंगतात फोर्टिफाईड तांदळाबाबत लाभार्थ्यांना शंका किंवा अडचणी असल्यास आपले तहसिल कार्यालयात पुरवठा विभागाशी संपर्क करण्यात यावा. फोर्टिफाईड तांदूळ हे तांदळाच्या पिठापासून बनलेले असतात. ज्यात आरोग्यासाठी आवश्यक सूक्ष्म् पोषक घटक असतात. प्रथम तांदळाचे भुकटी तयार केली जाते आणि त्यात लोह, फॉलिक सीड, व्हिटामिन बी-१२ चे सूक्ष्म् अन्नद्रव्य् मिश्रण केले जाते. या मिश्रणाला पुन्हा तांदळाचा आकार दिला जातो. यालाच फोर्टिफाईड तांदूळ म्हणतात. १०० किलोमध्ये १ किलो फोर्टिफाईड तांदूळ मिसळून वितरीत केला जातो.

फोर्टिफाईड तांदळाच्या वापराबाबत सर्व तालुक्यात जनजागृती करण्याबाबत सूचित केले असून, शासनामार्फत प्राप्त चलचित्र देखील प्रसारमाध्यमामधून प्रसारीत करण्यात आलेले आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना माहे सप्टेंबर २०२३ पासून गुणसंवर्धित तांदळाचा (फोर्टिफाईड तांदूळ) वितरण करण्यात येत आहे. सर्वसामान्य नागरिकांनी या तांदळाविषयी उठवणाऱ्या अफावांविषयी विश्वास ठेवू नये. शासनाने फोर्टिफाईड तांदळाच्या शुध्दतेचे व पौष्टिकतेचे सर्व निकष तपासलेले आहेत आणि शासनाने ते मान्य केले असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी सांगितले आहे.

## निवडणूक नियुक्त नोडल अधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन

## निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

# विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आवश्यक सर्व पूर्व तयारीच्या कामांना गती द्यावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विधानसभेच्या आगामी निवडणुकीसाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे. नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशप्रमाणे सर्व बाबींची पूर्तता करावी, निर्धारित कामे वेळेत पूर्ण करून सोपवलेल्या जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडाव्यात. तसेच विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व पूर्व तयारीच्या कामांना गती द्यावी अशा सूचना २५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

आगामी विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने सास्कृतिक भवन प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे निवडणूक नियुक्त नोडल अधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन लंगुटे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मदन जाधव, गटविकास अधिकारी सुशील संसारे, गटविकास अधिकारी योगेश कदम, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, मुख्याधिकारी चरण कोल्हे, पोलीस निरिक्षक विश्वजित घोडके,निवडणूक नायब तहसीलदार वैभव बुचके, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, विजय जाधव, निवडणूक विभागाचे राजेश सावळे, राजेंद्र शिंदे तसेच नोडल अधिकारी उपस्थित होते.



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आगामी विधानसभा निवडणूक २०२४ च्या निवडणूक कालावधीमध्ये कामकाज करण्यासाठी नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आल्या आहे. यामध्ये मुख्य नियंत्रण कक्ष, वाहतूक व्यवस्थापन, आदर्श आचार संहिता, बॅलेट पेपर आणि पोस्टल बॅलेट पेपर व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था, प्रसार माध्यम आणि संदेशवहन, निवडणूक निरीक्षक, प्रशिक्षण आणि जनजागृती, मतदान केंद्र, मतदान केंद्रावरील किमान मूलभूत सुविधा, दिव्यांग मतदार, स्वीप मोहीम शहरी व ग्रामीण भाग या निवडणूक विषयक कामकाजासाठी नोडल अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. नियुक्त नोडल अधिकाऱ्यांना सोपवलेल्या जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडाव्यात तसेच याबाबत सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या कामकाजाचा आढावा घ्यावा.ज्या मतदान केंद्रावर ५ टक्केपेक्षा कमी मतदान झाले आहे अशा ठिकाणी मतदार जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबवावी.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्याची खात्री करा. शांततापूर्ण निवडणुकांसाठी सुरक्षा योजना तयार करा. पोस्टल मतदानासाठी पात्र व्यक्तींना पोस्टल मतदानाबाबतची माहिती मुदतीत देण्यात यावी. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करावी. फ्लाइंग स्कॉड आणि एसएसटीसाठी मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे. निवडणूक संबंधित तक्रारींसाठी तयार करण्यात आलेल्या सी-व्हिजिल मोबाईल ॲपवर लक्ष ठेवावे. तात्काळ निराकरण करावे, अशा सूचनाही निवडणूक निर्णय अधिकारी इथापे यांनी यावेळी दिल्या.